संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# आनंदाचा क्षण पण त्याला राजकीय विरजण

**भारताने** अंतराळातली आपली शक्ती आज जगापुढे सिध्द केली आहे. संरक्षण विभागाच्या म्हणजेच डीआरडीओच्या शास्त्रज्ञांनी, संशोधकांनी अथक प्रयत्नानंतर हे यश मिळवले. याबद्दल त्यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. अंतराळातला उपग्रह पृथ्वीवरून सोडलेल्या क्षेपणास्त्राच्या माध्यमातून नष्ट करण्याची क्षमता मिळवणारा भारत हा जगातला चौथा देश ठरला आहे. आता ही घटना नेमकी निवडणूक काळात घडल्याने त्याचे राजकीय श्रेय घेण्याचा प्रयत्न सत्ताधारी पक्षाकडून झालेला दिसतो. ही गोष्ट खरी आहे की आचारसंहितेच्या काळामध्ये पंतप्रधानांनी राष्ट्राला उद्देशून संदेश द्यावा का किंवा तो तितका महत्त्वाचा होता का, या यशाची माहिती डीआरडीओच्या अधिकाऱ्यांकडून किंवा प्रतिनिधींकडून देता आली नसती का, परंतु या सर्वात मोठ्या ऐतिहासिक गोष्टीला महत्त्व देतानाच त्याची राजकीय संधीसुध्दा सत्ताधारी पक्षाने घेतलेली आहे. कदाचित हा प्रसंग इतका महत्त्वपूर्ण ठरला असावा की या घटनेसंदर्भात आंतरराष्ट्रीय प्रतिक्रिया व्यक्त होऊ शकतात किंवा भारताने केलेली ही कामगिरी कोणत्याही देशाच्या विरोधात नाही. ती भारताच्या विकास आणि समृध्दीचा एक टप्पा आहे. हे जगाला सांगण्याचे काम त्या राष्ट्राच्या प्रमुखाने करणे जर आवश्यक असेल तर मग मोदींनी राष्ट्राला उद्देशून केलेले भाषण संयुक्तिक ठरू शकते. परंतु आता दुर्दैवाने शास्त्रज्ञांच्या या अभूतपूर्व यशापेक्षाही मोदींनी केलेल्या भाषणाच्या विरोधालाच जास्त महत्त्व प्राप्त झाले. पूर्णपणे शास्त्रज्ञांच्या परिश्रमातून हे यश मिळाले. मोदींनी शास्त्रज्ञांचे आणि संशोधकांचे अभिनंदन करताना भारताने आता अंतराळशक्तीमध्ये चौथ्या क्रमांकाचे स्थान प्राप्त केल्याचा उल्लेख करून आपण केलेले हे भाषण कसे योग्य आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न होईल. कारण अशा प्रकारची मोहीम निश्चित करताना त्याचे खूप आधी वेळापत्रक तयार करावे लागते. त्या वेळापत्रकानुसारच हे मिशनशक्ती पार पाडण्यात आल्याचा खुलासाही केला जाईल. म्हणूनच राष्ट्राची सुरक्षितता ही निवडणुकांपुरत्याच मर्यादित असलेल्या राजकारणापेक्षाही श्रेष्ठ आहे. हे दाखवून देण्याचे काम सत्ताधारी पक्षाकडून केले जाईल.

### अंतराळ युध्द आणि भारताची सज्जता

राष्ट्रीय सुरक्षितता ही सर्वाधिक महत्त्वाची असते. ती केवळ निवडणुकांपुरती किंवा राजकारणाच्या परिघापुरती मर्यादित राहात नाही. भारताच्या या यशाची स्वाभाविकपणे जगाच्या प्रमुख देशांकडून दखल घेतली गेली. भविष्यकाळातील युध्दांचे स्वरुप हे अंतराळ युध्दासारखे राहील. कारण तंत्रज्ञान इतक्या प्रचंड वेगाने विकसित होत आहे की प्रत्यक्ष शत्रूच्या भूमीवर न जाता त्याठिकाणी चाललेल्या प्रत्येक हालचाली टिपता येऊ शकतात. अनेक प्रकारची गोपनीय माहिती सहजपणाने मिळवता येऊ शकते. सायबर युध्दानंतरचा स्पेस युध्द हा त्यातलापुढचा टप्पा ठरतो. जगातल्या प्रमुख देशांकडे जर अशा प्रकारची क्षमता असेल आणि भारताच्या शास्त्रज्ञांकडे तशाच प्रकारचे अत्याधुनिक संशोधन करण्याची सिध्दता असेल तर त्यांना ती संधी दिली गेली पाहिजे. आता जे उपग्रह नाहीसे करणारे तंत्रज्ञान शोधले गेले ते भारताकडे २०१२ सालीच उपलब्ध होते. परंतु त्यावेळच्या सरकारने परवानगी दिली नसल्याची माहितीही पुढे आली आहे. खरे तर शास्त्रज्ञांच्या आणि संशोधकांच्या या क्षमतेला पूर्णपणे प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. कारण अशा प्रकारची सिध्दता भारताकडे आहे. हा संदेशसुध्दा भारताची शक्ती वाढवणारा ठरतो किंवा भारताचे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे महत्व वाढवणारा ठरतो. म्हणूनच निवडणुका आणि राजकारण यांच्या पलीकडे जाऊन या मोहिमेचे स्वागत करता येऊ शकते. पंतप्रधानांनी स्वतंत्रपणे राष्ट्राला उद्देशून भाषण न करता केवळ अभिनंदनाचा संदेश पाठवून त्याचे महत्व सिध्द केले असते तरीदेखील ते औचित्याला धरून झाले असते. आता राष्ट्रीय दूरदर्शनचा आचारसंहितेच्या काळात पंतप्रधानांनी दुरुपयोग केल्याची टीका विरोधकांकडून होत आहे. अर्थातच निवडणुकांचा मोसम असल्यामुळे आता या टीकेलाही मोदींना तोंड द्यावे लागेल. किंबहुना आपण असा संदेश देण्याचा निर्णय का घेतला हेदेखील सांगावे लागेल. सुरक्षिततेसाठी शास्त्रज्ञ किंवा सैनिक झटत असतात. तेव्हा त्यांचे योगदान मान्य करायलाच हवे. आतादेखील भारताच्या अंतराळ शक्तीचे जगापुढे उदाहरण सिध्द केले गेले आहे. त्यासाठी जर उद्दिष्टेही अतिशय योग्य होते. म्हणजेच या राष्ट्रीय सिध्दीचे राजकीय साधन म्हणून वापर करण्याचा मोह टाळता आला असता.

### जगापुढे उदाहरण

आज निवडणुका नसल्या तर कोणीही या एवढ्या मोठ्या यशाचे राजकारणही केले नसते. मुळातच भारतासारख्या लोकशाही प्रधान देशात समाजकारण , राष्ट्रकारण या पेक्षाही राजकारणाचा जास्त उदोउदो होतो किंवा प्रत्येक गोष्ट ही राजकीय चष्म्यातूनच पाहिली जाते. जर का राष्ट्रगीत, राष्ट्रीय सुरक्षा या प्रत्यक्ष समाजाच्या विकासाचे मुद्दे हे जर राजकारणापासून अलग ठेवले तर खूप मोठी राजकीय परिपक्वता प्राप्त झाल्याचे समाधान मिळू शकेल. भारत ही जर जागतिक पातळीवर एक प्रमुख शक्ती म्हणून स्वतःचे महत्त्व वाढवित असेल तर त्या शक्तीला पूरक असेच व्यवहार या देशाच्या राजकारण्यांकडून व्हायला हवे. राज्यकर्त्यांनीसुध्दा तशी जबाबदारी पाळली पाहिजे. दुर्दैवाने भारतातील लोकशाही ही राजकारण्यांच्याच भरोशावर राबवली जाते. त्यांच्याकडे असलेले अमर्याद अधिकार याच लोकशाहीची देणगी ठरते. आणि मग असा राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रसंगातून त्याचा गैरवापर होताना दिसून येतो. राष्ट्रीय सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड होता कामा नये किंवा राजकारणासाठी राष्ट्रीय सुरक्षा बाजूला ठेवता कामा नये ही जशी वस्तुस्थिती आहे. तसेच राष्ट्रीय सुरक्षिततेचे राजकारणही होता कामा नये हीदेखील आचारसंहिता प्रकर्षाने पाळायला हवी. इतके मोठे राष्ट्रीयदृष्ट्या आनंदाचे क्षण पण त्याला राजकीय विरजण असे त्याचे स्वरूप पाहायला मिळते. ही सगळी वस्तुस्थिती सामान्य माणसाला थेट लक्षात येत नसली तरीसुध्दा ज्यांच्याकडे नेतृत्व असते त्यांनी यासंदर्भातले भान ठेवले पाहिजे.